www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

**Lang. Code : 11**

इस पुस्तिका में **20** पृष्ठ हैं ।
This booklet contains **20** pages.

# ATA-19-II

**प्रश्न-पत्र II / PAPER II**
**मराठी भाषा परिशिष्ट**
**Marathi Language Supplement**
**भाग IV & V / PART IV & V**

**परीक्षा पुस्तिका संकेत**
**Test Booklet Code**
**E**

**परीक्षा पुस्तिका संख्या**
**Test Booklet No.**

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए ।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20)पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें ।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 19 & 20) of this Test Booklet.**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें । / For instructions in Marathi see Page 2 of this Booklet.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं** ।
2. परीक्षार्थी भाग I एवं भाग II **या** III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से ।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं । भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं ।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल काले/नीले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें ।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **E** । यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है । अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग-IV : भाषा-I (मराठी) (प्र. 91 से प्र. 120)
   भाग-V : भाषा-II (मराठी) (प्र. 121 से प्र. 150)
7. भाग-IV में भाषा-I के लिए 30 प्रश्न और भाग-V में भाषा-II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं । इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं । **यदि भाषा-I और/या भाषा-II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए । जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए ।**
8. **परीक्षार्थी भाग-V (भाषा-II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा I (भाग-IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो ।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें ।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें । अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें । उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है ।

## *INSTRUCTIONS FOR CANDIDATES*

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part I and Part II **OR** III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Black/Blue Ball Point Pen only** for writing particulars on this page / marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **E**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part-IV : Language-I (Marathi) (Q. 91 to Q. 120)
   Part-V : Language-II (Marathi) (Q. 121 to Q. 150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language-I and/or Language-II is a Language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The language being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part -V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) : ____________________
Name of the Candidate (in Capitals) :
अनुक्रमांक : (अंकों में) ____________________
Roll Number : in figures
: (शब्दों में) ____________________
: in words
परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) : ____________________
Centre of Examination (in Capitals) :
परीक्षार्थी के हस्ताक्षर : ____________ निरीक्षक के हस्ताक्षर : ____________
Candidate's Signature : Invigilator's Signature :
Facsimile signature stamp of
Centre Superintendent ____________________

E

www.prepp.in

E | **(2)** | **Marathi-II**

**Lang. Code : 11**

ही पुस्तिका 20 प्रष्ठ आहे.

# ATA-19-II

**प्रश्नपत्रिका II**

**मराठी भाषा पुरवणी**

**भाग IV आणि V**

**चाचणी पुस्तिका कोड**

**E**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील (19 आणि 20) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

**परीक्षार्थींसाठी सूचना :**

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग IV (भाषा I) **किंवा** भाग V (भाषा II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे**.
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग I आणि भाग II **किंवा** III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ काळे / निळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड E** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू-2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

   **भाग IV : भाषा – I (मराठी)** *(प्र. 91 ते 120)*

   **भाग V : भाषा – II (मराठी)** *(प्र. 121 ते 150)*
7. भाग IV मध्ये भाषा I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग V मध्ये भाषा II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा I व/वा भाषा II साठी निवडलेली भाषा पेक्षा मराठी वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग V (भाषा II) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ______________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ______________________

: शब्दांमध्ये : ______________________

परीक्षाकेंद्र : ______________________

परीक्षार्थीची सही : ______________ पर्यवेक्षकाची सही : ______________

Facsimile signature stamp of

Centre Superintendent ______________________

www.prepp.in



परीक्षार्थींनी **भाषा – I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **(प्रश्न क्र. 91 ते 120)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-IV (Q.No. 91-120),** if they have opted **MARATHI** as **Language-I** only.

# भाग – IV
## भाषा – I
## मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा** – I चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **(प्रश्न क्र. 91 ते 120)** यांची उत्तरे द्यावीत.

**पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 91 ते 99 साठी योग्य पर्याय निवडा.**

आर्यावर्तातील प्राचीनतम भाषांपैकी एक होती संस्कृत. ती त्या काळातील ज्ञानभाषा होती. मुळात संस्कृत भाषेची संरचना ही शास्त्रनिर्मितीसाठी पोषक आहे. कारण त्या भाषेमध्ये सूत्रमयता आणि निःसंदिग्धता ही वैशिष्ट्ये आहेत. साहजिकच नेमका अर्थ व्यक्त करण्याच्या दृष्टीने विद्वान व बुद्धीनिष्ठ वर्गाने प्रामुख्याने याच भाषेवर लक्ष केंद्रित केले. परंतु संस्कृतखेरीज अनेक प्राकृत भाषाही आर्यावर्तात बोलल्या जात होत्याच. त्या भाषांचे महत्त्वही अनन्यसाधारण आहे. अनेक अभिजात संस्कृत नाटकांतील गौण पात्रे विविध प्राकृत भाषांत बोलतात. तेव्हा प्राचीनकाळी समाजातील सर्वसामान्यांचा मोठा वर्ग याच भाषा बोलत असावा. आजच्या अनेक भाषांच्या जडणघडणीत या प्राकृत भाषांचेही योगदान असणार हे निश्चित.

प्राकृत शब्दाचा शब्दकोशातील अर्थ नैसर्गिक, 'स्वाभाविक' असा आहे. अर्थातच तिला मूळ भाषा म्हणता येईल, जी बहुजनवर्गाकडून बोलली जात होती. ती विविध बोलींचा समूह होती आणि तिचे अस्तित्व थेट इसवीसनपूर्व चौथ्या शतकापासून इसवीसनोत्तर 1800 पर्यंत निश्चितपणे होते. या प्राकृत भाषांनी म्हणूनच त्यावेळी लिहिल्या गेलेल्या नाटकात प्रवेश केला. खासकरुन त्यांच्यापैकी शौरसेनी, माहाराष्ट्री आणि मागधी या भाषा नाटकीय प्राकृत भाषा म्हणून मान्यता पावल्या. याखेरीज प्राच्यभाषा, बाल्हिकी, दाक्षिणात्य, साकारी, द्रमिली अशाही अनेक भाषा होत्या ज्यांचा वापर संस्कृत नाटकात केला गेला आहे. द्रमिली ही खास वनवासीजनांची भाषा म्हणून वापरली गेली, तर नायिका आणि तिच्या सख्या शौरसेनी या प्राकृत भाषेचा वापर करतात. चेट, विट अशी पात्रे अवन्ति प्राकृत भाषेत बोलतात. गाथासप्तशती हा काव्यसंग्रह माहाराष्ट्री प्राकृतात रचलेला व विशेष मान्यता पावलेला ग्रंथ आहे. राजा हाल याने तो ग्रंथित केला. माहाराष्ट्री प्राकृत ही सातवाहन राजांची राजभाषा म्हणून मान्यता पावलेली होती.

माहाराष्ट्री, शौरसेनी आणि मागधी या मुख्य प्राकृत भाषांच्या संरचनेवरुन त्या कोणत्या स्थानी बोलल्या जात असाव्यात, याचा अंदाज बांधता येतो. माहाराष्ट्री प्राकृत ही भारताच्या नैऋत्य भागात बोलली जाणारी भाषा होती. तिचा प्रभाव कोंकणी, मराठी, सिंहली आणि मालदिवी भाषांवर दिसतो. शौरसेनी प्राकृत ही मध्य भारतात बोलली जात होती. तिचा प्रभाव हिंदी व तिच्या उपभाषा, तसेच पंजाबी भाषेवर दिसतो. मागधी प्राकृत ही पूर्व भारतात बोलली जाणारी भाषा होती. तिचा प्रभाव बंगाली, आसामी, बिहारी, भोजपुरी, मैथिली या भाषांवर दिसतो.

थोडक्यात, प्राचीन भारतात असंख्य प्राकृत भाषा अस्तित्वात होत्या, काही त्यांच्यातील रचनांमुळे आजही अभ्यासकांपर्यंत पोचलेल्या आहेत. भाषा ही प्रवाही असते. उगम पावणे, विकसित होणे किंवा रुपांतरित होणे हा तिचा धर्म आहे. या भाषांचे दुवे संस्कृती, इतिहास व समाजजीवन यांचे आरसे असतात. म्हणूनच हे दुवे निसटू नयेत, यासाठी त्यांचे जतन व्हायला हवे !

Prepp
Your Personal Exams Guide



**91.** सातवाहन काळात कोणत्या भाषेला राजभाषेचा दर्जा प्राप्त झाला होता ?

(1) मागधी

(2) महाराष्ट्री प्राकृत

(3) शौरसेनी

(4) मैथिली

**92.** हाल राजाला कोणत्या गोष्टीचे श्रेय दिले जाते ?

(1) भाषांच्या जडण-घडणीचे

(2) वनवासीजनांच्या भाषेचे

(3) गाथासप्तशतीच्या संपादनाचे

(4) इतिहास व समाज जीवनाचे

**93.** अभिजात नाटकांतील मुख्य पात्रे कोणती भाषा बोलत असे ?

(1) प्राकृत

(2) संस्कृत

(3) बिहारी

(4) भोजपुरी

**94.** संस्कृत नाटकांत 'द्रमिली' भाषेचा वापर कोणासाठी करण्यात येत असे ?

(1) नायिका

(2) नायिका व तिच्या सख्या

(3) वनवासीजन

(4) चेट व विट

**95.** पुढीलपैकी 'सामान्यनाम' कोणते ?

(1) शौरसेनी

(2) सिंहली

(3) प्राकृत

(4) कोंकणी

**96.** लेखिकेच्यामते महाराष्ट्री प्राकृताचा प्रभाव कोणत्या भाषेवर दिसत नाही ?

(1) कोंकणी

(2) मैथिली

(3) मराठी

(4) मालदिवी

**97.** 'पूर्व भारतात' कोणती भाषा बोलली जात असे ?

(1) मागधी प्राकृत

(2) शौरसेनी

(3) द्रमिली

(4) सिंहली

**98.** "संस्कृत आर्यावर्तातील <u>प्राचीनतम</u> भाषांपैकी एक होती." वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात शोधा.

(1) नाम

(2) सर्वनाम

(3) विशेषण

(4) क्रियापद

**99.** लेखिकेच्यामते सूत्रमयता आणि निःसंदिग्धता ही प्रामुख्याने कोणत्या भाषेची वैशिष्ट्ये आहेत ?

(1) संस्कृत

(2) महाराष्ट्री

(3) प्राकृत

(4) शौरसेनी

www.prepp.in



पुढील कविता वाचा आणि प्रश्न क्रमांक 100 ते 105 साठी योग्य पर्याय निवडा.

लिहू आभाळाला कसा, घेऊ कोणती मी शाई
आई सामावली त्यात, ती रे जन्माची पुण्याई !
आई आई बोलताना, दाटे काळजात काय ?
जखमांना शिवताना, आई होते माझी साय !
तिचे रुप विश्वव्यापी, तिची स्तुती विश्वापार,
आई शब्द आहे खास, जणू आत्म्याचा उद्गार !
आई ओंकार आरंभ, तीच वेद-गीता-गाथा,
आई लाभली जयाला, असे त्याचा उंच माथा !
माझे भाग्य आहे थोर, आई सोबत जगतो,
तिच्या मायेच्या उबेत, स्वप्न उद्याचे बघतो !

**100.** 'विशेषण' नसलेला पर्याय निवडा

(1) पुण्याई
(2) उंच
(3) ऊबदार
(4) स्वप्न

**101.** भविष्यकाळाचे स्वप्न कवी कशात पाहतो ?

(1) वेद
(2) गीता
(3) मायेची ऊब
(4) साय

**102.** आईच्या अस्तित्वाची नि व्यापाची तुलना कवीने कोणाशी केली आहे ?

(1) ओंकार
(2) गाथा
(3) आभाळ
(4) विश्व

**103.** क्रियापद असलेला पर्याय निवडा

(1) आई
(2) करते
(3) उंच
(4) माथा

**104.** पुढील पर्यायातील सर्वनाम शोधा

(1) तिचं
(2) काळीज
(3) आभाळ
(4) माया

**105.** जन्माच्या संचिताची उपमा कवीने कोणाला दिली आहे ?

(1) आभाळ
(2) आई
(3) विश्व
(4) वेद

www.prepp.in



(योग्य पर्याय निवडून प्र.क्र. 106 ते 120 यांची उत्तरे द्या)

**106. कौशल्यपूर्ण वाचन म्हणजे......वाचन नव्हे.**

(1) विधायक

(2) कल्पनारम्य

(3) प्रगमनशील

(4) ठरवून केलेले.

**107. दक्षतापूर्वक वाचनामध्ये खालीलपैकी कोणत्या गोष्टीचा समावेश होत नाही ?**

(1) त्यामुळे वाचनाचा जास्त आनंद मिळतो.

(2) सखोल अर्थ समजण्यासाठी लेखनातील बारकावे वाचता वेतात.

(3) यामुळे भाषा शिक्षणाला गती मिळते.

(4) असे वाचन म्हणजे संपूर्ण पुस्तकाचा सारांश समजावून घेणे होय.

**108. प्रक्रियात्मक लेखन पद्धतीत कोणत्या गोष्टीवर लक्ष केंद्रीत असते ?**

(1) लेखन पद्धती

(2) निष्पत्ती

(3) लेखन पद्धती व निष्पत्ती हे दोन्ही

(4) उत्तम हस्ताक्षर

**109. भाषेच्या अभ्यासक्रमात साहित्यिक मजकूराचा समावेश करण्याच्या दृष्टीने खालीलपैकी कोणती बाब सर्वांत कमी महत्वाची आहे ?**

(1) मजकूरामुळे फक्त वाचन आणि श्रवण कौशल्यामध्ये वाढ होते.

(2) मजकूर अधिकृत असतो.

(3) मजकूर वाचल्याने विद्यार्थ्यांना दुसऱ्या सांस्कृतिक बाबींची माहिती मिळते.

(4) विद्यार्थ्यांना मजकूर वाचून वैयक्तिक मत मांडण्यास प्रोत्साहन मिळते.

**110. खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?**

(1) विरामचिन्हे वाक्याचा अर्थ बदलू शकतात.

(2) विरामचिन्हांमुळे वाक्यात क्वचितच बदल होतो.

(3) विरामचिन्हांमुळे मजकुराचे सौंदर्य वाढते.

(4) विरामचिन्हांमुळे मजकूर वाचताना अडथला निर्माण होतो.

**111. विद्यार्थ्यांच्या लेखनाचे मूल्यमापन करताना प्रामुख्याने खलीलपैकी कोणत्या गोष्टीवर भर द्यावा ?**

(1) अचूक शुद्धलेखन आणि व्याकरण

(2) कल्पनांचे सादरीकरण

(3) मर्यादित शब्दसंख्या

(4) म्हणी आणि वाक्प्रचार यांचा उपयोग

**112. राष्ट्रीय अभ्यासक्रम रूपरेषा – 2005 मध्ये (National Curriculum Framework-2005) खालीलपैकी कोणत्या मार्गदर्शक तत्वाचा समावेश केला नाही ?**

(1) शालेय ज्ञानाची शालाबाह्य परीस्थितीशी सांगड घालणे.

(2) धोंकपट्टी पद्धतीने / पारंपारिक पद्धतीने चाललेल्या शिक्षणाची त्या पद्धतीपासून फारकत करणे.

(3) अभ्यासक्रम पाठ्यपुस्तक केंद्रीत करणे.

(4) मूल्यमापन पद्धती/परीक्षा पद्धती जास्त लवचिक आणि शालेय जीवनाशी एकरूप करणे.

**113. काय झाले, कसे झाले, कुठे झाले, केव्हां झाले, त्याचा परिणाम काय झाला याचे शाब्दिक वर्णन म्हणजे –**

(1) प्रकल्प कार्य

(2) स्वाध्याय

(3) प्रसंगअहवाल **(anecdotal record)**

(4) पदनिश्चयन श्रेणी **(rating scale)**

**114. विद्यार्थ्यांच्या भाषाशिक्षणातील प्रगती पाहण्यासाठी खालीलपैकी कोणती बाब सर्वात महत्वाचा पुरावा ठरेल ?**

(1) चाचणीमध्ये मिळालेले गुण

(2) विद्यार्थ्यांनी वापरलेली मौखिक व लिखित भाषा

(3) राष्ट्रीय अभ्यासक्रम व पाठ्यक्रम समजणे

(4) भाषेची उद्दीष्ट्ये आणि साध्य जाणून घेणे

**115. व्यगोत्स्कीच्या परातीकरण परिकल्पनेनुसार** (Scaffolding hypothesis) **शिक्षकाने भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना जोडीने किंवा समूहात काम करण्याची संधी द्यावी. कारण –**

(1) शिक्षकाला हे काम सहजपणे करता येईल.

(2) विद्यार्थी परस्पर काम करीत असल्याने शिक्षकाला विश्रांती मिळेल.

(3) विद्यार्थ्यांमधील परस्पर आंतरक्रियेमुळे त्यांना मोठ्या प्रमाणावर अध्ययनाची संधी मिळते.

(4) या प्रकारच्या आंतरक्रियेमुळे विद्यार्थी भाषा शिक्षणापासून दूर जातात.

www.prepp.in



116. विद्यार्थ्यांना भाषा शिकविताना अक्षरे, बाराखडी न शिकविता लहान लहान वाक्यांपासून सुरवात करावी. यावरुन कोणती गोष्ट लक्षात येते ?

(1) संपर्क संपूर्ण वाक्यावरच अवलंबून असतो.

(2) भाषा शिकण्यासाठी उच्चार शिकण्याची गरज नसते.

(3) भाषा शिकताना उच्चार आणि व्याकरण यांना सारखेच महत्व आहे.

(4) व्याकरण संपर्कासाठी अत्यावश्यक आहे.

117. इयता सातवीच्या वर्गामध्ये शिक्षक सर्वसामान्य विद्यार्थ्यांना यू ट्यूबचा वापर करुन विडीओ दाखवून शिकवितात अंध विद्यार्थ्यांना ध्वनिमुद्रित साहित्याचा वापर करुन शिकवितात् तर अपंग विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या खेलामधून भाषा शिकवितात.

या ठिकाणी मल्टिमिडीयाचा वापर शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या कोणत्या वैयक्तिक कारणांची काळजी घेण्यासाठी केला ?

(1) भाषिक भेद

(2) अध्ययन पद्धती

(3) अध्ययन अक्षमता

(4) अधिकृत पाठ्यसाहित्य

118. भाषा शिक्षकाने बोधात्मक दृष्टीकोणालून विद्यार्थ्यांच्या चुकांकडे कसे पहावे ?

(1) शिक्षणातील अडथळा व अडचण

(2) विचार करण्यासाठी वाव देणारी शैक्षणिक बाब

(3) चूक सुधारुन ती परत होऊ नये म्हणून काळजी घ्यावी.

(4) विद्यार्थ्याने निष्काळजीपणे केलेल्या चुकांची ताबडतोब दुरुस्ती करावी.

119. दक्षतापूर्वक ऐकणे म्हणजे......होय

(1) लक्षपूर्वक ऐकणे

(2) संयमपूर्वक ऐकणे

(3) शिस्तशीर ऐकणे

(4) सुधारणा करण्याच्या भूमिकेतून ऐकणे

120. मूक वाचनाने वाचकाला खालीलपैकी कोणत्या गोष्टीचा सर्वात कमी लाभ होतो ?

(1) शब्दसंग्रह

(2) व्याकरण

(3) बोलण्याचे कौशल्य

(4) वाचन कौशल्य

www.prepp.in



परीक्षार्थींनी **भाषा – II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **(प्रश्न क्र. 121 ते 150)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-V (Q.No. 121-150),** if they have opted **MARATHI** as **Language-II** only.

## भाग – V
## भाषा – II
## मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **(प्रश्न क्र. 121 ते 150)** यांची उत्तरे द्यावीत.

**पुढील उतारा वाचा आणि प्र. क. 121 ते 128 साठी योग्य पर्याय निवडा.**

सार्वत्रिक संपर्कासाठी प्रमाणभाषेची अनिवार्यता आहे, मात्र त्याचा अर्थ बोलीभाषांचे अस्तित्व निरर्थक आहे असा नव्हे. मुळात बोलीभाषांपासूनच प्रमाणभाषेची निर्मिती झाली आहे. अनेक बोलीभाषांमध्ये सारखे असलेले शब्द घेऊन ते प्रमाणभाषेत वापरले जातात. त्यामुळे प्रमाणभाषा व बोलीभाषा यांच्यात दुरावा असण्याचे काही कारण नाही. परंतु प्रमाणभाषा ही आर्थिक व्यवहाराचीही भाषा असल्यामुळे तिला आपोआपच वजन प्राप्त होते व त्याचा दबाव बोलीभाषांवर येतो. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात बोलीभाषा बोलणाऱ्यांची संख्याही कमी नसते. त्यामुळे त्यांचा आवाज त्यांच्या बोलीभाषेत ऐकला जाणे आवश्यक आहे. मराठीची बोलीभाषा असलेल्या कोकणीभाषेचे उदाहरण घेतले, तरी ही भाषा मुंबईपासून मंगलोरपर्यंत सहा–सात प्रकारे बोलली जाते. मराठवाड्यातली मराठी तिथल्या सात जिल्ह्यांत चार–पाच प्रकारे बोलली जाते. या सर्व बोलींमध्ये एक अंगभूत सौंदर्य आहे. या बोली तिथल्या मातीचा सुगंध आणि मानवी स्वभावाचे कंगोरे घेऊन जन्माला आल्या आहेत. भाषेचे श्रेष्ठत्व ठरविण्याचा निकष म्हणजे त्या भाषेत असलेले शब्दवैभव. मराठीतल्या बोलीभाषा या शब्दवैभवाने नटलेल्या आहेत. आज प्रमाणमराठीवर हिंदी व इंग्रजीचे मोठ्या प्रमाणावर आक्रमण होत आहे. मराठीतले अनेक शब्द मागे पडून त्यांची जागा इंग्रजी किंवा हिंदी शब्द घेत आहेत व त्याचा मराठीसमाज अभिमान बाळगत आहे. मराठीतील प्रतिशब्द किंवा पारिभाषिक शब्द क्लिष्ट असतात असा आक्षेप घेतला जातो, तो खराही असू शकतो, पण त्यावर उपाय 'सोपा मराठी शब्द' निर्माण करणे हा आहे, इंग्रजी किंवा हिंदी शब्द स्वीकारणे हा नाही. असे प्रतिशब्द निर्माण करण्यासाठी बरेच भाषातज्ज्ञ संस्कृतभाषेचा आधार घेतात आणि त्यामुळेच बहुधा प्रतिशब्द दुर्बोध किंवा क्लिष्ट होत असावेत. पण संस्कृतऐवजी बोलीभाषेतून प्रतिशब्द घेतले तर मराठीचे मराठीपण टिकवणे अधिक सोपे होईल. आजकाल वापरात येणाऱ्या नव्या व आधुनिक साधनांना बोलीभाषांत अनेक चपखल शब्द वापरले जातात. ते स्वीकारणे व वापरणे याला गावंढळपणा मानण्याचे काही कारण नाही. मराठीत हिंदी किंवा इंग्रजी शब्द पर्याय म्हणून स्वीकारताना ते गावंढळासारखे स्वीकारले जातात. याचे प्रसिद्ध उदाहरण म्हणजे 'गर्व' या शब्दाचा वापर. या शब्दाचा हिंदीतील अर्थ व मराठीतील अर्थ

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



अगदी परस्परविरोधी आहे. ज्या अर्थाने हा शब्द हिंदीत वापरला जातो, त्याला मराठीत 'अभिमान' असा शब्द आहे. गर्व, अभिमान, स्वाभिमान या शब्दांच्या भिन्न अर्थछटा मराठीत आहेत. त्या लक्षात घेऊन त्यांचा समर्पक वापर करण्याची सवय मराठीसमाजाने लावून घेतली नाही, तर मराठीचे हे भाषावैभव एके दिवशी लयाला जाईल आणि तिचे स्वरुप इंग्रजी किंवा हिंदीची गुलामभाषा असे होईल. बोलीभाषांच्या या दुर्दशेकडे लक्ष वेधण्यासाठी हे वर्ष बोलीभाषा वर्ष जाहीर करण्यात आले आहे.

**121. मराठीचे मराठीपण राखण्यासाठी काय केले पाहिजे ?**

(1) संस्कृत भाषेचा आधार घेणे

(2) इंग्रजी शब्द पर्याय म्हणून वापरणे

(3) हिंदी शब्द पर्याय म्हणून वापरणे

(4) बोलीभाषेतून शब्द घेणे

**122. 'दुरावा' शब्दाचा समानार्थी शब्द शोधा.**

(1) अंतर

(2) दुसरा

(3) अंगक

(4) अंजन

**123. लेखिकेच्यामते पुढीलपैकी कोणत्या गोष्टीची सवय आपण लावून घेतली पाहिजे ?**

(1) शब्दांच्या विविध अर्थच्छटा विचारात घेऊन त्यांचा समर्पक वापर करणे.

(2) इंग्रजी किंवा हिंदी शब्द स्वीकारणे.

(3) बोलीभाषेऐवजी संस्कृतमधून शब्द घेणे.

(4) नव्या व आधुनिक साधनांचा भाषेत वापर नाकारणे.

**124. 'दुर्बोध' या शब्दाचा विरुद्धार्थी पर्याय शोधा.**

(1) गूढ

(2) क्लिष्ट

(3) आकलनीय

(4) अनाकलनीय

**125. लेखिकेच्यामते पुढीलपैकी कोणत्या गोष्टीचे दडपण बोलीभाषेवर येते ?**

(1) सार्वत्रिक संपर्काचे

(2) संस्कृत भाषेचे

(3) नव्या व आधुनिक साधनांचे

(4) प्रमाण भाषेचे

**126. पुढीलपैकी कोणत्या उपक्रमातून भाषेचे श्रेष्ठत्व टिकवना येते ?**

(1) दुर्बोधता निर्माण करणे

(2) शब्दवैभवाचे जतन

(3) क्लिष्टता टिकवणे

(4) परकीय भाषेतील शब्द स्वीकारणे

**127. कोणत्या कारणास्तव पारिभाषिक शब्दांसाठी इंग्रजी किंवा हिंदीचे शब्द घेतले जात आहेत ?**

(1) मराठीतले प्रतिशब्द क्लिष्ट असतात

(2) मराठीत त्यांच्या वेगळ्या अर्थच्छटा आहेत

(3) मराठीपण टिकवणे सोपे जाण्यासाठी

(4) भाषेचे श्रेष्ठत्त्व टिकवण्यासाठी

**128. लेखिकेच्यामते पुढीलपैकी कोणत्या बाबीमुळे प्रमाणभाषेचे महत्त्व वाढते ?**

(1) मातीचा सुगंध

(2) आर्थिक व्यवहार

(3) दुर्बोधता

(4) शब्दवैभव

**पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 129 ते 135 साठी योग्य पर्याय निवडा.**

"दरवर्षी 28 फेब्रुवारीला विज्ञानदिन का साजरा करतात ?" मुक्ताच्या प्रश्नाने गप्पांना सुरुवात झाली.

"चंद्रशेखर वेंकटरामन यांनी 1928 मध्ये याच दिवशी रामन परिणामाचा शोधनिबंध प्रसिद्धीसाठी पाठवला. त्यांच्या सन्मानार्थ दरवर्षी भारतात 28 फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञानदिवस साजरा करतात," आदित्यने सांगितले.

"बरोबर, रामन परिणाम प्रकाशासंदर्भात असल्यामुळे प्रकाशाच्या गुणधर्मांची छोट्या-छोट्या प्रयोगांमधून आपण ओळख करुन घेऊ. नेहमी सरळ रेषेत जाणारा प्रकाश काही वेळा मात्र सरळ जात नाही. त्यामुळे होणारी गंमत आता पाहुया," असे म्हणत मुक्ताने एक कोरा कागद घेऊन त्यावर मार्करने दोन आडवे बाण काढले. तो कागद समोर धरत ती म्हणाली, "हे दोन्ही बाण एकच दिशा दाखवताहेत."

मग मुक्ताने काचेच्या ग्लासात पाणी भरुन तो कागद सर्वांना दिसेल असा धरत त्या ग्लासाच्या मागे नेला. "आता काय झालं ?" मुक्ताने विचारले.

"खालच्या बाणाची दिशा उलटी दिसायला लागली", प्राजक्ता म्हणाली, "ही जादू कशी झाली ?"

"ही जादू नाही," मुक्ता म्हणाली, "एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात जाताना प्रकाशकिरणांची दिशा बदलते. ग्लास ठेवण्याआधी कागदावरुन निघालेला प्रकाश हवेतून थेट तुमच्या डोळ्यांपर्यंत पोचत होता. पाणी भरलेला ग्लास मध्ये ठेवताच खालच्या बाणाकडून निघणारा प्रकाश आधी हवेतून, मग काचेतून, त्यानंतर पाण्यातून, मग काचेतून आणि शेवटी पुन्हा हवेतून प्रवास करत तुमच्या डोळ्यांपर्यंत पोचला. या प्रवासात प्रत्येकवेळी एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात जाताना प्रकाशानं दिशा बदलल्यामुळे अखेर त्या बाणाची दिशा उलटी दिसायला लागली."

मुलांनी टाळ्या वाजवून मुक्ताच्या प्रयोगाला दाद दिली.

"प्रकाश हा तरंगांचा बनलेला असतो, हे सर्वमान्य झालं का ?"

"नाही", विद्याताई म्हणाली, प्रकाश कधी कणासारखा तर कधी तरंगांसारखा वागतो, असं वेगवेगळ्या प्रयोगांमधून आढळलं आहे. त्यामुळे प्रकाश हा तरंगांच्या पुंजांचा (क्वांटम) असतो, असं शास्त्रज्ञ मानतात. रेणूंकडून जेव्हा असे प्रकाशपुंज विखुरतात तेव्हा त्यांच्या तरंगांमध्ये पडणारा फरक रामन यांनी आपल्या प्रयोगांमधून सिद्ध केला. हाच जगप्रसिद्ध 'रामन परिणाम' ! या शोधासाठी रामन यांना 1930 सालचं भौतिकशास्त्राचं नोबेल पारितोषिक देऊन गौरवण्यात आलं. भौतिकशास्त्राचं नोबेल पारितोषिक मिळवणारे रामन हे पहिले आणि आजपर्यंत एकमेव भारतीय आहेत."

"हा रामन परिणाम कुठे वापरतात ?" आदित्यने विचारले.

"औषधं आणि सौंदर्यप्रसाधनात वापरलेल्या रासायनिक घटकांची शुद्धता मोजण्यासाठी, विविध रत्नांचा अस्सलपणा पडताळण्यासाठी, मादक पदार्थांचा शोध घेण्यासाठी, तसंच पुरातन अवशेषांचा, भूगर्भाचा किंवा कर्करोगाच्या गाठीमधील घटकांचा शोध घेण्यासाठी रामन परिणाम वापरतात," तनुजाताईने सांगितले.

**129.** 'दाद' या शब्दाचा अर्थ नसलेला पर्याय निवडा.

(1) तक्रार

(2) प्रशंसा

(3) न्याय

(4) मोल

**130.** विज्ञानदिनाच्या औचित्याविषयीचा प्रश्न कोणी विचारला ?

(1) मुक्ता

(2) प्राजक्ता

(3) तनुजा

(4) आदित्य

**131.** मुलांनी प्रयोगाला कसा प्रतिसाद दिला ?

(1) करतल ध्वनीने

(2) कागदावर बाण काढून

(3) तिची चेष्टा करुन

(4) प्रकाशपुंज दाखवून

**132.** "नोबेल पारितोषिक मिळवणारे रामन हे <u>पहिले</u> भारतीय आहेत." वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात निवडा.

(1) अलंकार

(2) विशेषण

(3) विभक्ती

(4) सर्वनाम

**133.** मुक्ता प्रयोग करुन दाखवते त्यामागचे प्रयोजन कोणते ?

(1) नोबेल पारितोषिकाची माहिती देणे.

(2) कागदावर बाण काढून दाखवणे.

(3) प्रकाश परावर्तन समजावून सांगणे.

(4) सौंदर्यप्रसाधनांची माहिती देणे.

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



**134.** उताऱ्याप्रमाणे 'रामन परिणामा'चा वापर कुठे केला जात नाही ?

(1) रासायनिक घटकांची शुद्धता तपासण्यासाठी

(2) पारितोषिक गौरविण्यासाठी

(3) मादक पदार्थांचा शोध घेण्यासाठी

(4) रत्नांचा अस्सलपणा शोधण्यासाठी

**135.** बाणाची दिशा नेमक्या कोणत्या कारणास्तव उलटी दिसायला लागली ?

(1) चुकीचे बाण काढल्यामुळे.

(2) प्रकाशानं दिशा बदलल्यामुळे.

(3) कागद ग्लासच्या पुढे ठेवल्यामुळे

(4) मुक्ताच्या प्रयोगशीलते मुळे

(योग्य पर्यायाची निवड करून उत्तरे द्या प्र.क्र. 136 ते 150)

**136.** गहन वाचनामुळे विद्यार्थ्यांमध्ये खलीलपैकी कोणत्या गोष्टीत रुची निर्माण होते ?


(1) अर्थ माहित नसलेल्या शब्दांचा अर्थ शोधणे

(2) मजकुरातील व्याकरणविषयक भाग अभ्यासणे.

(3) कविता पाठ करणे.

(4) मजकूर आनंदासाठी वाचणे.

**137.** शिक्षिका 'लेह' वरील घडा शिकविण्यास सुरवात करणार असते. त्या अगोदर ती फळ्यावर 'लेह' संबंधी एक आकृती काढून चर्चा सुरु करते.




फळ्यावरील या आकृतीस काय म्हणतात ?

(1) भौगोलिक नकाशा

(2) संबोध नकाशा

(3) विषयनिष्ठ नकाशा (thematic map)

(4) नकाशा साधन

**138.** विद्यार्थी अतिशय उत्तम पद्धतीने लिहीतात जेव्हां

(1) शिक्षिका विद्यार्थ्यांना श्रुतलेखन सांगते

(2) मजकूर विद्यार्थ्यांशी संबंधित व अर्थपूर्ण असतो.

(3) मजकूर शिक्षिकेशी संबंधित व तिच्यसंस्कृतीशी मिळताजुळता असतो.

(4) मजकुरामध्येल उच्चारलेले शब्द आणि लिखित शब्द यामध्ये सहसंबंध असतो.

**139.** खालीलपैकी कोणती बाब उत्पादक अभिगमाची (**Product approach**) निष्पत्ती नाही ?

(1) ती संपूर्णपणे शिक्षककेंद्रित असते.

(2) ती वर्तनप्रतिकृतीवर आधारित असते.

(3) तिचा भर दर्जेदार उत्पादनावर असतो.

(4) ती उत्पादनावर आणि कल्पनानिर्मिती केंद्रित असते.

www.prepp.in



**140.** प्रतिमा उपागमसंदर्भात विद्यार्थ्यांना लेखनकार्य देताना शिक्षकाने खालीलपैकी कोणत्या बावीचा वापर करु नये ?

(1) बुद्धीमंथन

(2) श्रुतलेखन

(3) आराखडा देणे

(4) मुद्रित शोधन

**141.** प्रत्येक भाषेच्या वर्गाचा भूमिकाभिनय पद्धती हा अविभाज्य घटक असला पाहिजे कारण –

(1) त्यामुळे विद्यार्थ्यांना गप्पा मारता येतात.

(2) वर्गव्यवस्थापनाची ही आदर्श पद्धती आहे.

(3) यामुळे विद्यार्थ्यांना गोष्ट लक्षात राहण्यास मदत होते.

(4) यामुले विद्यार्थ्यांना भाषेमध्ये अर्थपूर्ण संवाद साधण्यास मदत होते.

**142.** जेव्हां एखाद्या विद्यार्थ्याला विषयावर किंवा घटनेवर छोटीशी कविता तयार करण्यास सांगितले जाते.

त्यावेळी तो कशाचा वापर करतो ?

(1) सर्जनशील विचार

(2) परानुभूति विचार

(3) जाणिवपूर्वक विचार

(4) सांस्कृतिक विचार

**143.** उत्तम वाचक होण्यासाठी विद्यार्थ्याच्या शब्दसामर्थ्यात वाढ होणे आवश्यक आहे. खालीलपैकी कोणत्या गोष्टीमुळे ते शक्य होईल ?

(1) विद्यार्थ्याने भरपूर शब्द, तसेच समानार्थी व विरुद्धार्थी शब्द लक्षात ठेवावेत.

(2) नवीन शब्द अभ्यास त्या शब्दाचा अर्थ शब्दकोशात पहावा.

(3) विद्यार्थ्याने वाचन आलेले अवघड शब्द, अधोरेखित करावेत व त्यांचा वाक्यात उपयोग करावा.

(4) विद्यार्थ्याने नवीन शब्दाच्या अर्थाचा संदर्भानुसार अंदाज करावा.

**144.** शिक्षक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील काही महत्वाच्या घटनांच्या नोंदी करतात.

या नोंदीस ........ म्हणतात

(1) रुब्रिक्स (rubrics)

(2) संचयिका

(3) निरीक्षण

(4) प्रसंग अहवाल (anecdotal record)

**145.** खालीलपैकी यशस्वी वकृत्व स्पर्धेचे लक्षण कोणते ?

(1) असमान विद्यार्थ्यांनी भाग घेणे.

(2) विद्यार्थ्यांना बोलण्याची संधी देणे.

(3) विद्यार्थ्यांना फक्त लक्ष्य भाषेत बोलण्यास सांगणे

(4) प्रभावी वर्ग व्यवस्थापनासाठी उत्तम बोलणाऱ्या विद्यार्थ्यांना जास्त संधी देणे

www.prepp.in



**146.** भाषा शिकण्यासाठी व्यगोत्स्कीच्या दृष्टीने सर्वात महत्वाचा घटक कोणता ?

(1) सामाजिक अभिसरण

(2) पाठ्यपुस्तक

(3) रेडिओ

(4) शब्दकोष

**147.** भाषणकौशल्य वादविण्यासाठी खलीलपैकी कोणत्या उपक्रमाची सर्वात जास्त मदत होते ?

(1) विद्यार्थी एखाद्या विषयावर छोटे औपचारिक सादरीकरण करतात.

(2) शिक्षक विद्यार्थ्यांना सहेतुक श्रुतलेखन देतात

(3) विद्यार्थ्यांना मुद्दे दिले असता, त्या मुद्द्यांवरुन विद्यार्थी गोष्ट तयार करुन सांगतात

(4) विद्यार्थी उत्तमपैकी प्रकल्प अहवाल तयार करतात

**148.** खालीलपैकी कोणत्या पद्धतीने विद्यार्थ्यांना जुन्या ज्ञानाची नवीन मिळविलेल्या ज्ञानाशी आणि बाह्य जगतील वातावरणाशी सांगड घालता येईल ?

(1) अगोदरचे वाचन

(2) वाचत असतांनाच

(3) वाचण्यापूर्वी

(4) नंतरचे वाचन

**149.** बोधात्मक सिद्धांतानुसार मुळे भाषा अतिशय परिणामकारकरित्या शिकतात – जेव्हां –

(1) शिक्षिका संपूर्ण वर्ग नियंत्रित करते विद्यार्थ्यांना कमी वाव देते

(2) शिक्षिका विद्यार्थ्यांना व्याकरणाचे नियम पाठ करण्यास प्रोत्साहन देते

(3) विद्यार्थी फळ्यावरील उत्तरे व्यवस्थितपणे उतरवून घेतात.

(4) शिक्षिका विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या कौशल्यांवर आधारित कृतींवर सहभागी होण्यास प्रोत्साहन देते.

**150.** चांगला श्रोता ______

(1) शब्दांचा अचूक उच्चार कसा करावा, हे जाणतो.

(2) शब्द कोणत्या अर्थाने वापरला आहे, हे जाणतो.

(3) त्यावरील प्रश्नांना अचूक उत्तरे देतो.

(4) प्रत्येक शब्द अचूकपणे उच्चारतो.

www.prepp.in



## SPACE FOR ROUGH WORK

Your Personal Exam Guide

www.prepp.in



**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्न पत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.
2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या बाजू-2 वर केवळ एकच वर्तुळ निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर वे बदलता येणार नाही.
3. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.
4. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.
5. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.
6. OMR उत्तरपत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेश पत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.
7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभा गृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.
8. मोबाईल फोन, तार रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.
9. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.
10. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.
11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल.
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.
13. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.
14. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.
15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.**

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :**

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें ।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **काले/नीले बॉल पॉइन्ट पेन** से भरें । एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है ।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ । परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें ।
4. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के संकेत या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी ।
5. परीक्षा पुस्तिका / उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका संकेत व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से हाज़िरी-पत्र में लिखें ।
6. OMR उत्तर पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी । इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए ।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है ।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्वीच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए । इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और उनके विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित ।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें ।
11. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं हाज़िरी-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे । यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार हाज़िरी-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा । **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अंगूठे का निशान हाज़िरी-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ ।**
12. इलेक्ट्रॉनिक / हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है ।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी बोर्ड के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं । अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला बोर्ड के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा ।
14. किसी हालत में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें ।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल / कक्ष छोड़ने से पूर्व उत्तर पत्र कक्ष-निरीक्षक को अवश्य सौंप दें । परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं ।**

**READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY:**

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Black/Blue Ball Point Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet / Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the examination halls/rooms. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against them including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his / her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his / her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/Room without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where a candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic / Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Board with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Board.
14. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Hall / Room.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***

Your Personal Exams Guide